# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करणेबाबत**

**(१) ३८९४ (१५-०१-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभागाचे विभाजन करुन जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी चिपळूण येथे उपप्रादेशिक कार्यालय व्हावे अशाप्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी व वाहनधारकांनी केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०१-२०१६) :** (१) होय.

(२) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई शहरातील उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय एपीएमसी मार्केटच्या छोट्या जागेत सुरु असल्याबाबत**

**(२) ६९७८ (०७-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरातील उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालय एपीएमसी मार्केटच्या छोट्या जागेत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोने नेरुळ सेक्टर-१३ येथे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या इमारतीसाठी भूखंड उपलब्ध करुन दिला असून त्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाने सिडकोला अनामत रकक्म ही अदा केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित रक्कम सिडकोला अदा करण्यासंबंधीची परवानगी अद्यापि शासनाकडून मिळालेली नसल्याने इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मंजुरी मिळण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०४-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.
मुळ कराराची सर्व रक्कम सिडकोला अदा करण्यात आली आहे.
(४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नवीन अंदाजपत्रकानुसार नवी मुंबई उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत बांधकाम प्रस्तावास मान्यता देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

---

## अमरावती जिल्ह्यातील पेढी प्रकल्पाच्या क्षेत्रात बाधित झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत

**(३) १२५४० (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील पेढी प्रकल्पाच्या क्षेत्रात आळणगाव, कुंडखुर्द, कुंडसर्जापूर, गोपगव्हाण, हातुर्णा, सावरखेड व ओझरखेड ही गावे येतात या सात गावातील १ हजार ७६१ कुटुंब प्रकल्पबाधित झाली असल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पामुळे बाधित झालेल्या कुटुंबाच्या पुनर्वसना संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०१-२०१६) :** (१) होय.
(२) पेढी प्रकल्पामुळे कुंडखुर्द, गोपगव्हाण, आळणगाव, हातुर्णा व कुंड सर्जापुर ही ५ गावे पूर्णत: ओझरखेड व सावरखेड ही २ गावे अंशत: बाधित होत आहेत. पुर्णत: बाधित होणाऱ्या या पाच गावांच्या पुनर्वसनाची स्थळ निश्चिती झालेली असून, त्या पैकी कुंडखुर्द व आळणगाव या दोन पुनर्वसित गावांच्या ९० टक्के नागरी सुविधा पुर्ण झाल्या आहेत. कुंड सर्जापुर, गोपगव्हाण या गावच्या नागरी सुविधेच्या कामाची अंदाज पत्रके मंजूर प्रक्रियेत आहे. कुंडखुर्द, सर्जापुर, गोपगव्हाण या गावाच्या जुन्या घरांचा मोबदला वाटप झाला आहे. अळणगाव या गावठाणाच्या घराच्या मुल्यांकनाची केस निवाडा स्तरावर आहे व मौजा हातुर्णा या गावाच्या

पुनर्वसन जागेबाबत ग्रामसभेमध्ये गावकऱ्यांचे एकमत होत नसल्यामुळे, गावकऱ्यांचे लेखी विकल्प मागविण्यात आले होते. आता स्थळ निश्चिती झाली असून मौजा पांढरी येथे पुनर्वसन करण्याचे निश्चित झाले आहे. नवीन गावठाणाचा ताबा अद्याप अप्राप्त आहे. बाधित गावठाणातील घरांचे संपादन नवीन कायद्यानुसार कलम ११ च्या प्रक्रीयेत आहे. मौजा सावरखेड या गावचे अंशत: पुनर्वसन करावयाचे असून पुनर्वसन स्थळ निश्चिती व्हावयाची आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी श्रमिक मुक्ती दलाच्या आंदोलनाबाबत**

**(४) १७२४१ (१४-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी श्रमिक मुक्ती दलाचे आंदोलन सुरू असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणग्रस्तांच्या मागण्या काय आहेत तसेच या मागण्यांवर शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :** (१) व (२) होय. श्रमिक मुक्ती दल यांचेमार्फत दि. २६.३.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना नवीन भूसंपादन कायद्यात केंद्र शासनाने केलेले अन्यायकारक बदल तातडीने मागे घ्यावेत व अन्य तीन मागण्यांबाबत निवेदन दिलेले आहे. सदर मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १२ मे, २०१५ रोजी माझ्या अध्यक्षतेखाली श्रमिक मुक्ती दल यांचे समवेत बैठक घेण्यात आली असून, उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उपप्रादेशिक कार्यालयासाठी भडगांव (जि.जळगांव) हे ७-८ तालुक्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण असल्याचे या ठिकाणी आरटीओ कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(५) १९७४२ (०६-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपप्रादेशिक कार्यालयासाठी भडगांव (जि.जळगांव) हे ७-८ तालुक्यांसाठी मध्यवर्ती ठिकाण असल्याचे या ठिकाणी प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०३-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यामध्ये भविष्यकाळात नवीन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील धानाच्या किंमतीबाबत

**(६) २१५०४ (०६-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात सुमारे ८० टक्के बारीक धानाची शेती केल्या जात असून मागीलवर्षी १८०० ते २००० भाव असलेल्या बारीक धानाला यावर्षी ७०० ते ८०० रुपये कमी भावाने विकावे लागत असून शासनाने खतावरील सबसिडी कमी केल्याने खताच्या किंमतीत मोठया प्रमाणात वाढ झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने धानाच्या किंमती वाढवून रासायनिक खताच्या किंमती कमी करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलडाणा) येथे नविन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत

**(७) २१६५२ (१२-०८-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथे नविन उपप्रादेशिक, परिवहन कार्यालय सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री परिवहन यांचेकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव हे जिल्ह्यातील मध्यवर्ती तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी केंद्र व राज्य शसनाची बरीच कार्यालये आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खामगांव, शेगाव, नांदुरा, जळगांव जामोद, संग्रामपूर या गांवातील नागरिकांना सुध्दा बुलडाणा येथे पासींग करीता जावे लागते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गांवातील नागरिकांसाठी खामगांव येथे नविन उपप्रादेशिक कार्यालय सुरु करण्याबबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०३-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) होय. उप प्रादेशिक कार्यालय, बुलडाणा यांच्यामार्फत प्रत्येक महिन्यात खामगाव येथे २ व शेगाव, नांदूरा, जळगाव जामोद येथे प्रत्येकी १ असे कॅम्प घेण्यात येतात. या कॅम्पाच्या ठिकाणी शिकाऊ अनुज्ञप्ती, पक्के अनुज्ञप्ती, नवीन नोंदणी व वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र देण्याचे काम करण्यात येते. या शिबीराच्या दिवसांव्यतिरिक्ति जर वाहन/अनुज्ञप्तीधारकाचे कामकाज असल्यास बुलडाणा येथे येणे आवश्यक आहे तसेच वाहन हस्तांतर, भाडे खरेदी करार, परवाना, ना-हरकत प्रमाणपत्र, अनुज्ञप्ती नुतनीकरण व इतर कामाकरिता मुख्यालय कार्यालय बुलडाणा येथे वाहन/अनुज्ञप्ती धारकास यावे लागते.
(४) व (५) राज्यामध्ये भविष्याकाळात नवीन प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करण्याकरिता निकषांची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर दिनांक ११.०२.२०१६ च्या आदेशान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.

---

## रामटेक (जि.नागपूर) स्टेट बँकेने तहसिल कार्यालयाकडून शेतक-यांना नुकसानभरपाई पासून वंचित ठेवल्याबाबत

**(८) २२८३१ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) येथील स्टेट बँकेने तहसिल कार्यालयाकडून शेतक-यांना नुकसानभरपाई पासून वंचित ठेवल्याची बाब माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यातील शेतक-यांकरिता १६,५२,०२१/- रुपयांचा धनादेश दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास स्टेट बँकेत बॅक ऑफ बडोदा मार्फत पाठविण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांना नूकसान भरपाई न देता नाहक त्रास देणा-या स्टेट बँकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०४-२०१६) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) व (४) तहसिलदार, रामटेक यांचे खाते बँक ऑफ बडोदा आहे. तर खरीप हंगाम २०१४ मधील बाधित पिक नुकसान झालेल्या पात्र खातेदारांचे बहुतांश खाते हे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा रामटेक येथे आहेत. तहसिलदार रामटेक यांनी दि. २३.१.२०१५ नुसार रक्कम रु. १६,५२,०२१/- धनादेश क्र. ००२५४८ अन्वये पिक नुकसान झालेल्या ३२१ बाधित खातेदारांच्या बँक खात्यात जमा करण्याकरिता पाठविण्यात आली. त्यानुसार बँक ऑफ इंडिया, शाखा रामटेक यांचेकडे संपूर्ण रक्कम ३२१ बाधित खातेदारांच्या खात्यात वळती केली. परंतु स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा रामटेक यांनी सदर रक्कम संबंधित बाधित खातेदाराच्या खात्यामध्ये जमा केली नव्हती, रु. १६,५२,०२१/- या रकमेत तफावत असल्याने बँकेने संबंधित खातेदाराच्या खात्यात रक्कम जमा केली नव्हती. बँकेत चौकशी केली असता सदर बाब लक्षात आली. त्यानंतर तफावतीची रक्कम रु. ५३,००१/- तात्काळ दुसऱ्या दिवशी धनादेश क्र. ००२२६० दि. ६.५.२०१५ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा रामटेक यांना निर्गमित केला. त्यानंतर सदर रक्कम संबंधित बाधित खातेदाराच्या खात्यामध्ये जमा केली.

---

**मुंबईतील उबर टॅक्सी चालकाने एका महिला प्रवाशाशी अरेरावी करुन धमकी दिल्याबाबत**

**(९) २३९८६ (११-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील उबर टॅक्सी चालकाने एका महिला प्रवाशाशी अरेरावी केली व धमकी दिली असे तानिया सिकंद या महिलेने फेसबुकवरील पोस्टच्या माध्यमातून कळविल्याचे दिनांक ६ जून, २०१५ व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महिलेसाठी तीच्या मित्राने लोअरपरेल ते लोखंडवाला अंधेरी येथे जाण्यासाठी उबर टॅक्सी बुक केली होती, या पोस्टनंतर उबर ने सदर टॅक्सी चालकावर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिल्ली गुडगाव येथे टॅक्सी चालकाने महिलांसोबत छेडछाड व अत्याचार केल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त घटना टाळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे व आश्वाससनानुसार उबेरने सदर घटनेतील टॅक्सीचालकास सेवेतून काढून टाकले आहे.
(३) अशी घटना घडल्याची माहिती केंद्र शासनाकडून प्राप्त झाली होती.
(४) टॅक्सी सेवेचे नियमन करण्यासाठी “सिटी टॅक्सी स्किम, २०१५” ही नियमावली तयार करुन व ती प्रसिध्द करुन त्यावर सर्वसामान्यांच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या

होत्या. त्याप्रमाणे प्रापत झालेल्या सूचनांनुसार सुधारित केलेला नियमावलीचा मसुदा अंतिम करण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लोहारा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) माकणी येथे बसथांबा नसल्याबाबत

**(१०) २६१४७ (११-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबद) येथे मंजूर असलेले बसथांबा अद्यापपावेतो बांधण्यात न आलेल्याबाबत व सदर बसथांबा बांधण्यास विलंब होण्यास कारणीभूत असणा-यांवर कायदेशीर कारवाई होणेबाबत उमरगा - लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनाक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच माकणी येथे मंजूर असलेला बसथांबा बांधण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०६-२०१६) :** (१) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१.०८.२०१२ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे.
(२) प्रवासी निवाऱ्याच्या बांधकामासाठी अतिक्रमणविरहीत आवश्यक मोकळी जागा ग्रामपंचायत माकणी यांनी अद्याप राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात दिलेली नाही. तसेच लोकप्रतिनिधीकडून त्यांच्या स्थानिक विकास कार्याक्रमांतर्गत निधी अजूनही उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे जागा ताब्यात आल्यानंतर तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार माकणी येथे प्रवासी निवारा बांधणे शक्य होणार आहे. निधीकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाही खाली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांकरीता भूखंड मिळण्याबाबत

**(११) २६७१४ (१७-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील २२५७१ धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्तांकरीता वाटप करण्याकरीता २३०२९ भूखंड आरक्षित करण्यात आले असूनही केवळ १८३४५ कुटूंबांनाच पुनर्वसित करण्यात आलेचे माहे जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पानशेत, वरसगाव, उजनी ही धरणे बांधून चाळीस वर्षे उलटूनही ५५० वर प्रकल्पग्रस्तांना आजवर भूखंड मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) तसेच पुनर्वसन होण्याकरिता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :** (१) होय.
(२) सदर प्रकल्पामुळे बांधित झालेल्या व पुनर्वसनांतर्गत भूखंड वाटप करावयाच्या एकूण १०५५३ प्रकल्पग्रस्तांपैकी ५८४ प्रकल्पाग्रस्तांना भूखंड वाटप करणे बाकी आहे.
(३) व (४) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडे उजनी, विरबाजी पासलकर व पानशेत प्रकल्पग्रस्तांना भूखंड मागणीच ४९ अर्ज प्राप्त झाले असून, भूखंड वाटपाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल व पेण आरटीओ विभागात येणा-या रिक्षा मालाकांना आर्थिक भुर्दंड पडू नयेबाबत**

**(१२) २८५९९ (१५-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या नवीन धोरणानुसार रिक्षा परवाना वैधता प्रमाणपत्राचा दंड एक रक्कमी करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर टाटा मॅजिक व टॅक्सी धारकांना तसेच टूरिस्ट टॅक्सी चालक मालकांना आर्थिक भुर्दंड पडू नये म्हणून गाडी पासिंगसाठी भरावा लागणारा दंड माफ करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्या दरम्यान सचिव, परिवहन विभाग यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेण-पनवेल प्रादेशिक परिवहन विभागातील टाटा मॅजिक व टॅक्सी धारकांना तसेच टूरिस्ट टॅक्सी चालक मालकांना गाडी पासिंगसाठी भरावी लागणारी फी उशिरा भरल्यास प्रती दिन १०० रुपये दंड आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चालक मालकांना आर्थिक भुर्दंड पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३१-०५-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) या विषयीचे अधिकार प्रदान करण्यात आलेल्या मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने योग्यता प्रमाणपत्र मुदत समाप्ती नंतरच्या प्रत्येक दिवसासाठी रु. १००/- (मात्र किमान रु. १०००/- व कमाल वाहनाच्या किंमती इतके) तडजोड शुल्क निश्चित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साखर, रुईला तसेच अन्य डाळी हरभरा आणि तांदूळ यांना हमीभाव मिळण्याबाबत**

**(१३) २८८९५ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊसाला किंमत मिळण्याकरिता साखरेला हमीभाव त्याचप्रमाणे कापसाला किंमत मिळण्याकरिता रुईला तसेच अन्य डाळी हरभरा आणि तांदूळ यांना त्याच धर्तीवर हमीभाव मिळण्याकरिता केंद्र शासनास शिफारस करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत केंद्र शासनास शिफारस केली आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून याबाबत राज्यास कोणता प्रतिसाद मिळाला आहे,

(४) नसल्यास, राज्य शासन हमीभाव मिळण्याकरिता कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०३-२०१६) :** (१) नमूद विषयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजीचे पत्र शासनाला प्राप्त झालेले आहे, हे खरे आहे,

(२), (३) व (४) किमान अधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. केंद्र शासन ज्या शेतपिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहिर करित असते. त्यामध्ये ऊस, कापूस, हरभरा व धान तसेच अन्य डाळी आणि तांदुळ हे शेती पीकावर (मालावर) प्रक्रिया करुन तयार केलेले उत्पादन आहे. त्यामुळे या प्रक्रिया केलेल्या मालाकरिता केंद्र शासन किमान आधारभूत किंमती जाहीर करत नसते.केंद्र शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीमध्ये प्रक्रिया केलेल्या मालाचे हमीभाव घोषित केले जात नसल्याने केंद्र शासनाला लोकप्रतिनिधींचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही.

---

**मौजे लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथे नवीन बस स्थानक उभारण्याबाबत**

**(१४) २९१८१ (१३-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाखनवाडा (ता.खामगाव, जि.बुलडाणा) येथील प्रवाश्यांच्या व विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वारंवार बसस्थानकाची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. महामंडळाने सदर मागणीच्या अनुषंगाने नवीन बसस्थानक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०६-२०१६) :** (१) नाही.
(२) लाखनवाडा येथे नवीन बसस्थानक बांधण्याबाबत कोणताही प्रस्ताव नाही. तथापि, प्रवासी सुविधा विचारात घेता मौजे लाखनवाडा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे राज्य परिवहन महामंडळामार्फत प्रवासी मार्ग निवारा ४०x१० फुट आकाराचा बांधण्यात आलेला आहे. तेथील लोकसंख्या ८७८८ असून जाणाऱ्या - येणाऱ्या फेऱ्या ४८ आहेत. वाहतूकीसाठी सध्याचा प्रवासी निवारा पर्याप्त आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील लक्ष्मी दहिवाडी गावाला कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमांतर्गत अनुदान मिळण्याबाबत**

**(१५) २९३२१ (१५-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील लक्ष्मी दहिवाडी गावाची कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमांतर्गत निवड केली परंतु या योजनेचे अनुदान रखडले असल्याने लक्ष्मी दहिवाडीतील शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रलंबित असलेले अनुदान तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ करीता कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पित एकुण रु. ५०.०० कोटी रकमेपैकी रु.३५.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर कृषी विभागासाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत तयार करुन देण्याबाबत**

**(१६) २९३२७ (१५-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर कृषी विभागाचे चार उपविभागीय (एसडीएओ) कार्यालये आणि १३ तालुका कार्यालये भाडयाच्या जागेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयांच्या भाडयापोटी लाखो रुपये द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नागपूर कृषी विभागासाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत तयार करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) नागपूर जिल्ह्यात ४ उपविभागीय कृषि अधिकारी यांची कार्यालये असून नागपूर मुख्यालयातील कार्यालय शासकीय इमारतीत कार्यरत आहेत. उमरेड, रामटेक, काटोल येथील उपविभाग कार्यालये खाजगी इमारतीत आहेत. एकूण १३ तालुका कृषि अधिकारी यांची स्वतंत्र कार्यालये असून अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी यांची सुध्दा स्वतंत्र कार्यालये त्याच इमारतीत कार्यरत आहेत. १३ तालुक्यांपैकी नागपूर, कामठी, सावनेरे, कुही या चार तालुक्यांची कार्यालये शासकीय इमारतीत व ९ तालुक्यांची कार्यालये खाजगी इमारतीत कार्यरत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एनटीपीसी) सोलापूर येथील प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत**

**(१७) २९५६८ (१८-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एनटीपीसी) सोलापूर येथील प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना पुनर्वसनाचे लाभ देण्यासाठी प्रकल्पग्रस्तांना प्रत्येक एकरसाठी २.५ लाख रुपंयाची जादा नुकसानभरपाई देण्याचा निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने प्रकल्पाग्रस्तांना प्रत्येक एकरसाठी २.५ लाख रुपंयाची जादा नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.
दिनांक १५.९.२०१५ रोजी माझ्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीमध्ये एनटीपीसी प्रकल्पबाधितांना १२.५ टक्के विकसित जमिनीऐवजी रुपये २.५ लाख प्रति एकर इतकी रोख रक्कम देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने एनटीपीसीच्या सुधारित पुनर्वसन योजनेला दिनांक १.१.२०१६ च्या बैठकीत मंजूरीही देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पानशेत, वरसगांव, वीर, चासकमान धरणग्रस्तांचे जिल्हा पातळीवरील प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(१८) २९६३७ (१४-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पानशेत, वरसगांव, वीर, चासकमान धरणग्रस्तांचे जिल्हा पातळीवरील प्रश्न मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यासोबत बैठक घेऊन प्रश्न भाग १ मधील प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे आश्वासन पुणे जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी दिले असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे नाही. अशी बैठक घेण्यात आलेली नाही.

पुणे जिल्ह्यातील पानशेत, वरसगांव, वीर व चासकमान प्रकल्पबाधितांना पुनर्वसनांतर्गत नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत तसेच बहुतांश प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटपही करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात येणा-या सर्व कृषी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) ३०००८ (१५-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात येणा-या सर्व कृषी कार्यालयातील रिक्त पदावर भरती गेल्या अनेक वर्षापासून झाली नसल्याने अपु-या कर्मचा-यांना कार्यभार पहावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाअंतर्गत ६५० जागांना मंजूरी मिळाली आहे यापैकी ५२४ जागांची भरती करण्यात आली असून उर्वरित सव्वाशे जागा मात्र अद्यापही रिक्तच असल्याने तुटपुंज्या कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त भार पडत आहे हे पाहता शासनाने उर्वरित सव्वाशे जागा त्वरीत भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) कृषि अधिकारी/मंडळ कृषि अधिका-यांची पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेप्रमाणे सरळसेवा कोट्यातील ५० पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही कार्यान्वित आहे. तसेच पदांचा आढावा व अद्ययावत जेष्ठता सूची प्रसिध्दीची कार्यवाही झाल्यानंतर सदर संवर्गात पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क व ड मधील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरणेसंदर्भात अनुक्रमे कृषि आयुक्तालय व विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरसगांव (ता.वेल्हे, जि.पुणे) धरण येथील पाटबंधारे खात्याचे शासकीय जमीनीवरील अतिक्रमण काढणेबाबत

**(२०) ३०१२१ (१८-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसगांव (ता.वेल्हे, जि.पुणे) धरण येथील पाटबंधारे खात्याचे शासकीय जमीनीवरील अतिक्रमण काढणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मदत व पुनर्वसन मंत्री महोदय यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२२-०३-२०१६) :** (१) अशा प्रकारचे निवेदन मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयात २०१४-२०१५ या कालावधीत अपघातग्रस्तांना अद्याप जनता अपघात विम्याची मदत न मिळाल्याबाबत

**(२१) ३३०४८ (१५-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात १ नोव्हेंबर, २०१४ ते ३१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत जिल्हयातील १०६ अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालयाकडे प्राप्त झाले असता काही प्रस्ताव रद्द तर काही त्रुटीची पूर्तता करण्यासाठी परत पाठविण्यात आले असून मंजूर २१ अपघातग्रस्तांना अद्याप जनता अपघात विम्याची मदत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपघात विमा योजनेतील त्रुटीची पूर्तता करावयाचे प्रस्ताव मंजूर करुन व मंजूर प्रस्तावांना जनता अपघात विम्याची रक्कम तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :** (१) अहमदनगर जिल्हयात दि. १ नोव्हेंबर, २०१४ ते ३१ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीतील एकूण १९९ अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर कार्यालयाकडे प्राप्त झालेले होते. प्राप्त झालेले सर्वच प्रस्ताव विमा कंपनीकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यापैकी १३२ प्रस्ताव मंजूर होऊन १३१ प्रकरणात संबंधितांचे खात्यावर विमा कंपनीने एनईएफटीद्वारे रक्कम वर्ग केलेली आहे. एका प्रकरणात बँक खात्याची माहिती अपूर्ण असल्याने रक्कम वर्ग होऊ शकलेली नाही. २५ प्रकरणे योजनेच्या अटी व शर्तीत बसत नसल्याने मंजूर होऊ शकली नाहीत व २३ प्रकरणे कागदपत्रांअभावी प्रलंबित असून १९ प्रकरणे विमा कंपनीस्तरावर कार्यवाहीत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील आरटीओ कार्यालयात वाहनधारकांची विविध कामांसाठी सादर केलली कागदपत्रे गहाळ झाली असल्याबाबत**

**(२२) ३३१८० (१८-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनधारकांची विविध कामांसाठी सादर केलली कागदपत्रे ठिकठिकाणी ढीग पडून असल्यामुळे अनेक वाहनधारकांची कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागदपत्रांअभावी कामे अडत असल्याने वाहनधारकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०३-२०१६) :** (१) व (२) प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये कार्यालयातील सर्व विभागातील

अभिलेखाची पहाणी केली असता जुने व कालबाह्य कागदपत्रे जतन करण्याची आवश्यकता नसतांना देखिल गठ्ठे बांधून ठेवण्यात आल्याचे व त्यामुळे कार्यालयातील विभागांमधील जागा अशा कागदपत्रांमुळे व्यापून गेल्याचे निदर्शनास आले. सबब, दैनंदिन प्राप्त झालेली कागदपत्रे ठेवण्यासाठी जागा राहिलेली नव्हती तसेच कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये देखील इतर अनेक निकाली काढण्यात आलेली कागदपत्रे ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने दि. ०४/०९/२०१५ व दि. १०/०९/२०१५ रोजी कार्यालयीन आदेशान्वये नियमानुसार नष्ट करण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांचे व्यवस्थित गठ्ठे बांधण्याबाबत. संबंधित कर्मचारी यांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कालबाह्य कागदपत्रांचे गठ्ठे बांधून व हांड्यात ठेवण्यात आले होते.

कार्यालयातील कागदपत्रे गहाळ झालेली नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिल्लोड तालुक्यातील मिरची उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२३) ३३१८८ (१५-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यातील मान्सून पूर्व मिरचीवर उष्णतेचा परिणाम झाला आहे वाढत्या उन्हामुळे मिरचीच रोपे अर्धे मेली झाली असून ती वाळण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिल्लोड तालुक्यातील मिरची उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औरंगाबाद येथे खताचा साठा सुरक्षित करण्यासाठी कृषी आयुक्तालयाने परवानगी देऊन कार्यन्वित करण्याबाबत

**(२४) ३३१८९ (१५-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे खताचा साठा सुरक्षित करण्यासाठी कृषी आयुक्तालयाने परवानगी दिली नसल्याने यंदा बांधावर खत योजना अडचणीत असल्याची माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या ही योजना परवानगी देऊन कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही, रासायनिक खताचा संरक्षित साठा करणे व बांधावर खत वाटप उपक्रम या दोन्ही बाबी भिन्न आहेत, औरंगाबाद जिल्ह्यात खरीप हंगामात २२१ टक्के खत पुरवठा झालेला आहे. जिल्ह्यात मे २०१५ अखेर ७००५१ मे. टन खत साठा शिल्लक होता. त्यामुळे रासायनिक खतांचा संरक्षित साठा करण्यात आलेला नाही.

औरंगाबाद येथे खतसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे शेतक-यांकडून बांधावर खत वाटप उपक्रमांतर्गत खताची मागणी आलेली नाही त्यामुळे या उपक्रमांतर्गत खते वितरीत करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दुष्काळी परिस्थिती असतांना हवामानावर अधारित फळ पिक विमा योजनेच्या हप्त्यात कंपनीने वाढ केल्याबाबत

**(२५) ३३४०८ (१५-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थिती असतांना हवामानावर अधारित फळ पिक विमा योजनेच्या हप्त्यात कंपनीने वाढ केल्याचे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर जिल्ह्याला या योजनेतून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फळ उत्पादक शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळण्यासाठी व वाढीव हप्ता कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

आंबिया बहार सन २०१५-१६ करिता दि. १९.८.२०१५ रोजी उघडण्यात आलेल्या निविदांमध्ये भाग घेणाऱ्या कंपन्यांनी काही फळपिके व काही जिल्ह्यांकरिता मागील वर्षापेक्षा अधिक दर नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही,

(३) व (४) विमा कंपन्यांशी दि. ३१ ऑगस्ट, २०१५ व दि. १२ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वाटाघाटी केल्यानंतर दि. ३ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये हवामानावर आधारित फळ पीक विमा योजना आंबिया बहार सन २०१५-१६ साठी लागू करण्यात आली आहे.

---

**राज्य परिवहनच्या इगतपुरी आगाराच्या स्थानिक बसेसना**
**घोटी पथकर नाक्यावर पथकर माफी मिळणेबाबत**

**(२६) ३५७३९ (१३-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहनच्या इगतपुरी आगारापासून ५ ते ६ कि. मी. अंतरावर मुंबई - नाशिक महामार्गावर घोटी पथकर नाका असून इगतपुरी आगाराच्या स्थानिक बसेस या मार्गावरून दररोज २० ते २५ फेऱ्या मारतात. पैकी बऱ्याच बसेसचा पथकर मार्गावरील वापर इगतपुरी ते घोटी असा ६ कि. मी. एवढाच असून सदर बसेसना घोटी पथकर नाक्यावर पथकर माफी मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. परिवहन मंत्री यांचेकडे दि. २६/०८/२०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुशंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) नाशिक ते मुंबई महामार्गावरील घोटी येथे शासनामार्फत सन २०११ मध्ये पथकर नाका सुरु करण्यात आला. इगतपुरी आगार ते घोटी पथकर नाका यामधील अंतर ६ कि.मी. इतके असून इगतपूरी आगाराच्या एकूण १५७ फेऱ्या या पथकर नाक्यावरुन ये-जा करतात. पथकराचा प्रतिफेरी दर रु. ३४५/- इतका आहे. मात्र रा.प. महामंडळाच्या इगतपूरी आगाराच्या १५७ फेऱ्यांना रु. ८५/- या सवलतीच्या दराने पथकर आकारणी करण्यात येते. मासिक पथकराची रक्कम रु. ३,५७,८८५/- इतकी आहे. आदिवासी व दुर्गम भागात प्रवाशी सेवा देणाऱ्या ३ मिडी बसेसच्या एकूण ६ फेऱ्या एक पाणी वाहतूक टँकर यांना पथकर माफी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**युरीया खताचा काळा बाजार रोखण्याकरिता शेतकऱ्यांना कृषी कार्ड योजना लागू करण्याबाबत**

**(२७) ३५७९६ (१५-१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या युरीया खताचा काळा बाजार रोखण्यासाठी, युरीया खत मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषी कार्ड देण्याची योजना शासनाचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषी कार्ड वितरण योजनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची जिल्हानिहाय पाहणी करुन त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२८) ३५७९९ (१४-०१-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे हैरान झालेल्या आणि अवकाळी पाऊस यामुळे शेकडो शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत जिल्हानिहाय पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबाना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०३-२०१६) :** (१), (२) व (३) दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीत राज्यात एकूण ३२२८ शेतकरी आत्महत्या झाल्या असून त्यापैकी जिल्हा स्तरीय समितीने १८४१ आत्महत्या मदतीस पात्र ठरविल्या आहेत. पात्र प्रकरणांपैकी १८१८ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रु. १.०० लक्ष मदत देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आटपाडी (जि. सांगली) याठिकाणी डाळिंब लागवडीचे क्षेत्र वाढविणेबाबत**

**(२९) ३५९५९ (१५-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि. सांगली) याठिकाणी शासन मान्यताप्राप्त डाळिंब नर्सरी नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांना डाळिंब लागवडीचे शासकीय अनुदान मिळत नाही, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर डाळिंब लागवडीचे क्षेत्र वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०२-२०१६) :** (१) होय.
(२) आटपाडी (जि.सांगली) येथील शेतक-यांना "कसबे डिग्रस" येथील कृषि विद्यापीठाच्या फळ रोपवाटिकेतून कलमे/रोपांचा पुवठा करण्यात येतो. त्यानुसार डाळिंब लागवडीचे अनुदान शेतकऱ्यांना अदा करण्यात येते.
(३) रोजगार हमी योजना व महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतक-यांना फळबाग लागवड करण्यास प्रवृत्त केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात रब्बी हंगामासाठी युरीया खताचा साठा उपलब्ध करण्याबाबत

**(३०) ३६१४७ (१५-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रब्बी हंगामासाठी आवश्यक असलेल्या युरीया खताचा साठा शासनाकडे पुरेसा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे उक्त प्रकरणी काय नियोजन केले आहे,
(३) असल्यास, युरीया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१), (२) व (३) राज्यात रब्बी हंगाम २०१५-१६ करिता केंद्र शासनाने ११.५० लाख मे. टन युरीया खतांचा साठा मंजुर केलेला आहे. त्यामुळे युरीया खताचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात भाज्या, फळे, दूध इत्यादी अन्नपदार्थाच्या नमुन्यांमध्ये कीटकनाशकांचा अंश आढळल्याबाबत

**(३१) ३६३१६ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय कृषी मंत्रालयाने देशभरातील घाऊक व किरकोळ दुकानांमधून जमा केलेल्या भाज्या, फळे, दूध इत्यादी अन्नपदार्थांच्या नमुन्यांचे प्रयोगशाळांमध्ये केलेल्या परिक्षणांमध्ये मान्यता नसलेल्या कीटकनाशकांचा अंश आढळल्याचे, तसेच किटकनाशकांचे प्रमाण कमाल मर्यादेपक्षा अधिक असल्या बाबतचा अहवाल प्रसिध्द केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनुषंगाने राज्य शासनाने राज्यातील अन्न पदार्थाचे परीक्षण केले आहे काय, असल्यास सदर परीक्षणात काय आढळून आले आहे आणि राज्यातील नागरिकांच्या नेहमीच्या आहारातील अन्नपदार्थातील कीटकनाशकांचे प्रमाण कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, राज्यातील कीटकनाशक माहे जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत १३५६ नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ७ नमुन्यामध्ये कीटकनाशकांचा अंश क्षम्य मर्यादेपेक्षा जास्त आढळून आला आहे. याबाबत राज्याच्या विस्तार व प्रशिक्षण यंत्रणेमार्फत कीटकनाशकांचा योग्य प्रमाणात लेबल क्लेम प्रमाणे वापर करण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनांतर्गत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा राबविणे याबाबत क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्यात आले आहे. तसेच बियाणे, खते, कीडनाशके खरेदी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत भितीपत्रकाद्वारे जनजागृती करणे यासाठी गुणनियंत्रक विभागामार्फत निरीक्षकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यामधील डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठातील ५० ते ६० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(३२) ३६३३४ (१५-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यामधील डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठातील ५० ते ६० टक्के पदे रिक्त असल्यामुळे त्यांचा परिणाम संशोधन आणि इतर कामावर जाणवत असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठातील अपु-या कर्मचा-यांमुळे विद्यापीठाची यंत्रणा पुर्णत: कोलमडली असून कामाचा अतिरिक्त भार कार्यरत कर्मचा-यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विद्यापीठातील कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याकरीता मागील अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते परंतु अद्यापपर्यंत सदर पदे भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिक्त कर्मचा-यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०२-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने वरीष्ठ व कनिष्ठ संशोधन सहाय्यकांची एकूण १२९ पदे मार्च, २०१५ मध्ये भरली आहेत. तसेच ३० सहयोगी प्राध्यापकांची पदे भरण्याची कृषि विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु आहे. २५३ मजुर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश दि.१६.०१.२०१५ रोजी विद्यापीठाने निर्गमित केले आहेत. वित्त विभागाचा शासन निर्णय दि.०२.०६.२०१५ नुसार रिक्त पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकी पदे भरण्यास परवानगी आहे. त्यानुसार कृषि विद्यापीठास कळविण्यात आले आहे.

(४) शा.नि.०२.०६.२०१५ नुसार रिक्त पदांपैकी ५०% किंवा एकूण संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकी रिक्त पदे भरण्याबाबत डॉ.पंजाबराव देश्मुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना निदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावनेर तालुक्यातील सर्व शिवारात तणनाशक फवारणीमुळे पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३३) ३६३६३ (१५-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तननाशक फवारणीमुळे सावनेर तालुक्यातील सर्व शिवारात पीक नुकसानीचे तालुका कृषी अधिकारी श्री. अशोक गायमुखे यांनी स्वत: पाहणी न करता मंडळ अधिकाऱ्यांकडून पाहणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी अधिकाऱ्यांची तक्रार कृषी आयुक्ताकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पीक नुकसान झालेल्या १० शेतकऱ्यांना शासनाने नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच तालुका कृषी अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) एका ऊस उत्पादक शेतकऱ्याने फवारलेल्या तणनाशकामुळे शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांवर त्याचा दुष्परिणाम झाल्याबाबत व त्यासंदर्भात कृषि अधिकाऱ्याने पहाणी करुन पंचनामा न केल्याने त्याची कृषि आयुक्तालयाकडे तक्रार झाल्याबाबतची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली होती, हे खरे आहे.

(३) या प्रकरणी तालुका तक्रार निवारण समितीचे सदस्य सचिव कृषि अधिकारी, पंचायत समिती सावनेर, तालुका कृषि अधिकारी, सावनेर व संबंधित कृषि सहाय्यक यांनी दिनांक २३/१०/२०१५ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष मोका पाहणी केली असता तक्रारीत नमुद केल्यानुसार तननाशक वापरामुळे नुकसान झाल्याचे पाहणीत आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील १०४ गावांमध्ये चालक, वाहक यांची निवास व स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेबाबत**

**(३४) ३६५९३ (१३-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील राज्य परिवहन महामंडळाच्या वस्ती गाडयांपैकी १०४ गावांत चालक, वाहकांना रात्री वस्तीचे वेळी निवारा व स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्याने त्यांची प्रचंड गैरसोय व असुरक्षिततेचे होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वस्ती गाड्यांचे चालक, वाहकांना वस्तीचेवेळी निवारा व स्वच्छतागृहाची गैरसोईबाबत एस.टी.कामगार संघटनेने आंदोलनही केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर १०४ गावांमध्ये चालक, वाहक यांची सदर निवारा व स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) निर्मलग्राम/हागणदारी मुक्त गाव या योजनेंतर्गत शौचालय/निवास पुरविण्याची बाब ही जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येते. त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , रत्नागिरी यांन चालक/वाहकांसाठी रात्रवस्तीचे ठिकाणी शौचालय/निवास पुरविणेबाबत राज्य परिहवन महामंडळाच्या स्तरावरुन केलेल्या पाठपुरव्याअंती २०३ रात्रवस्तीपैकी ९९ ठिकाणी शौचालयाची व निवासाची व्यवस्था उपलब्ध झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा आगारात (जि.जळगाव) नवीन बसेस मिळणे बाबत**

**(३५) ३६७७६ (१३-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा आगारात (जि.जळगाव) सुमारे ६६ वाहने असून यातील ८० टक्के गाड्या या ७ ते ८ लाख किलो मीटर चाललेल्या आहेत व ७ ते ८ वर्षापूर्वी जुन्या आहेत, तसेच यातील

काही बस गाड्या टाटा कंपनीच्या असून त्याचे पार्ट मिळत नसल्याने जुनेच पार्ट दुरुस्त करून वापरत असल्याने काही ठिकाणच्या फे-या रद्द होत असल्यामुळे या आगाराकारीता नवीन ५० बसेस देण्यासंर्भात स्थानिक लोकप्रतीनिधींनी दि.१४.७.२०१५ रोजीच्या सुमारास मा.परिवहन मंत्री यांना लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार या आगारास नवीन बसेस देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :** (१) होय.
(२) पाचोरा आगारात एकूण ६९ बसेस असून त्यापैकी २ बसेस टाटा बनावटींची आहेत. पाचोरा आगारास गाड्यांचे सुटे भाग दरकरारधारक पुरवठाधारकाकडून जळगाव विभागामार्फत आवश्यकतेप्रमाणे सुट्या भागांची खरेदी करुन पुरविले जातात.

पाचोरा आगारास सन २०१३-१४ मध्ये २, सन २०१४-१५ मध्ये २ व सन २०१५-१६ मध्ये (डिसेंबर, २०१५ पर्यंत) ४ अशी एकूण ८ नवीन वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दररोज एक कोटी प्रवाशांची वाहतुक करण्याची क्षमता असलेल्या एस.टी. महामंडळाची स्थिती सुधारण्याबाबत**

**(३६) ३६८७९ (१८-०१-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दररोज एक कोटी प्रवाशांची वाहतुक करण्याची क्षमता असलेल्या एस.टी. महामंडळाची स्थिती गेल्या काही वर्षापासून मोठ्या प्रमाणात खालावली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची कारणे काय आहेत व ही स्थिती सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) दर चार वर्षांनी होणारा कामगार करार, दर सहा महिन्यात महागाई भत्यात होणारी वाढ, भांडार सामुग्री किंमतीत होणारी वाढ, खाजगी व अवैध वाहतूकीत वाढ इ. कारणांमुळे महामंडळाला तोटा होत आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने सुचना प्रसारित करण्यात आलेल्या असून उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटीमध्ये बदल, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजाती २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाड्यात सवलत, वार्षिक सवलत

कार्ड, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील कार्यालयात विविध योजना कोट्यावधी रुपयांचा निधी मिळूनही तब्बल दोन वर्षापासून बंद असल्याबाबत**

**(३७) ३६८८१ (१२-०१-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लोकसंख्येपैकी १७ टक्के असलेल्या अल्पसंख्याक समुदायाच्या आर्थिक उन्नतीसाठी असलेल्या योजनेसाठी असलेल्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचा नाशिक जिल्हयातील कार्यालयात विविध योजना, कोटयवधी रुपयांचा निधी मिळूनही तब्बल दोन वर्षापासून बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयातील विविध योजना बंद असल्याची कारणे काय आहेत व त्या तातडीने सुरु करण्याबाबत शासनामार्फत कोणत्या उपाययोजन केल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०३-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी विभागाकडून पिकांवर फवारण्यात येणा-या औषधे व किटकनाशकांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याबाबत**

**(३८) ३६९७९ (१५-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषी विभागाकडून पिक उत्पादन वाढण्यासाठी वेगवेगळे उपाय व मार्गदर्शन केले जाते या मार्गदर्शनाने शेतकरी आपल्या शेतामध्ये अधिक उत्पादन घेण्यासाठी औषधे व किटकनाषकांचा उपयोग करत असतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना पिकावरील औषधे व किटकनाषके मारण्याबाबत कोणतेही मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले जात नाही जादा पिक उत्पादनासाठी अधिकाधिक औषधांचा वापर करण्याची शेतक-यांची मानसिकता वाढलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिक उत्पादन घेणेच्या हेतून चुकीच्या पध्दतीने केलेल्या फवारणीमुळे अनेक नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत असून या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने संपूर्ण राज्यातील नागरीकांचे सुरक्षित राहण्यासाठी शेतकरी यांना उत्पादन

केलेल्या फळे, भाजीपाला व इतर पिकांवर फवारण्यात येणा-या औषधे व किटकनाशकांवर नियंत्रण व मार्गदर्शन करण्याबाबत एक स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत कृषी विभागामार्फत निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :** (१), (२) व (३) कापूस, सोयाबीन, भात, तूर व हरभरा या पिकावरील किडरोगांच्या व्यवस्थापनासाठी "पिकावरील किडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)" हा प्रकल्प कृषी विभागामार्फत राबविण्यात येतो. यामध्ये उपरोक्त नमुद पिकांचे किड सर्वेक्षकांद्वारे सर्वेक्षण करण्यात येते. सर्वेक्षण केलेल्या किडरोगाबाबतचे विश्लेषन राज्यातील कृषी विद्यापीठांतील संशोधनाकडून करण्यात येऊन, त्याबाबतच्या उपाययोजना बाबतचे सल्ले शेतकऱ्यांना एसएमएस द्वारे देण्यात येतात.

पिकांवर केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे शेतकऱ्यांना किड रोगांविषयी करावयाच्या पिकसंरक्षण उपाययोजना याबाबतचे संदेश देणे, शेतकऱ्यांमध्ये कीड रोगाची ओळख निर्माण करणे, त्यांना प्रशिक्षित करुन कीडरोगाचे वेळीच व्यवस्थापन करणे, कीडरोगांच्या प्रादुर्भावाबाबत जागरुकता निर्माण करणे व पुढील संभाव्य नुकसान टाळून उत्पादनात वाढ करणे, हे क्रॉपसॅप प्रकल्पाचे मुख्य उद्देश आहेत.

एसएमएसद्वारे संदेश देण्याव्यतिरिक्त भित्ती पत्रके, घडीपत्रिका, आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्र व इतर प्रसार माध्यमाद्वारे, त्याचप्रमाणे गावबैठका, जम्बो झेरॉक्सद्वारे शेतकऱ्यांना किडरोगाबाबतच्या उपाययोजनांचा शेतकऱ्यांपर्यंत प्रसार केला जातो.

त्याचप्रमाणे, फळे व भाजीपालावरील किडरोग व्यवस्थापनासाठी हॉर्टसॅप हा प्रकल्प राबविण्यात येतो.

पिकांवर किडरोगांचा प्रादुर्भाव झाला असल्यास किडरोग दुर करण्यासाठी शेतकऱ्यांना किटकनाशके व औषधे ५० % अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी-निजामपूर शहरात मोठ्या प्रमाणात अल्पसंख्यांक समाजाला पायाभूत सुविधांसाठी अल्पसंख्यांक सुधार कामासाठी निधी मिळण्याबाबत

**(३९) ३७००४ (१२-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ५भिवंडी-निजामपूर शहरात मोठ्या प्रमाणात अल्पसंख्यांक समाज रहात असून त्या वस्त्यामधील पायाभूत सुविधांसाठी अल्पसंख्यांक सुधार कामासाठी निधी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.अल्पसंख्यांक मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०३-२०१६) :** (१) होय.

श्रीमती नदिया खान, नगरसेवकि भिवंडी- निजामपूर महानगरपालिका, यांनी दि.१०/६/२०१५ रोजी मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांना तसेच श्री. रुपेश म्हात्रे, विधानसभा सदस्य (भिवंडी पूर्व) यांचे दि. २७/०७/१५ व दि. १८/०६/१५ रोजीचे मा.अल्पसंख्याक मंत्री यांना पत्र पाठविलेले आहे.

(२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि.१८/०६/१५ अन्वये अल्पसंख्याक बहुल शहरांसाठी प्राधान्याने तसेच महानपगरपालिका नगरविकास/नगरपंचायत यांच्या एकूण लोकसंख्येपैकी किमान १०% लोकसंख्या अल्पसंख्याकांची आहे. अशा शहरांतील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. त्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त होणे आवश्यक आहे. उपरोक्त लोकप्रतिनिधी यांचे पत्रासोबत जिल्हाधिकारी ठाणे यांच्या मान्यतेने प्रस्ताव अप्राप्त होते. त्यामुळे सदर पत्र जिल्हाधिकारी ठाणे यांना दि.०९/११/२०१५ च्या शासन पत्रान्वये उचित कार्यवाही करिता त्रुटीपत्र पाठविण्यात आले. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या मान्यतेने भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६ (भाग-१)/ का.९, दि.२३/११/१५ अन्वये रु.२० लक्ष भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेस क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत विहित करण्यात आलेल्या मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भडगाव तालुक्यात (जि.जळगाव) येथील रद्द करण्यात आलेल्या बस फेऱ्या पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४०) ३७७४६ (१३-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव तालुक्यात (जि.जळगाव) शाळांना सुट्या लागताच अनेक बस फेऱ्या बंद करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिकांनी वारंवार संबंधितांकडे तक्रारी करुनही या बस फेऱ्या सुरु करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,येथील रद्द करण्यात आलेल्या बस फे-या पुन्हा सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) भडगांव बसस्थानकावरुन शालेय विद्यार्थ्यांकरीता राज्य परिवहन महामंडळामार्फत ४ नियतांद्वारे २३ शालेय फेऱ्या चालविल्या

जातात. सदरच्या फेऱ्या शाळांना सुट्टी पडलेल्या कालावधीमध्ये बंद करण्यात येतात व शाळा सुरु झाल्यावर पुर्ववत सुरु करण्यात येतात.

शाळांना सुट्टी पडलेल्या कालावधीमध्ये बंद करण्यात येणाऱ्या फेऱ्यांमुळे विद्यार्थी व प्रवाशांच्या गैरसोयीबाबत कोणत्याही तक्रारी राज्य परिवहन महामंडळाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जाफराबाद (जि.जालना) येथील बस आगारामध्ये डिझेल टाकी नविन बसविण्याबाबत**

**(४१) ३७८३१ (१३-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफराबाद (जि.जालना) येथील बस आगारामध्ये बसविण्यात आलेल्या डिझेल टाकीमध्ये सहा हजार लिटर पाणी निघाले असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर,२०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डिझेल टाकी २१ वर्षापूर्वीची असून नवीन टाकीची मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेल टाकीमध्ये गळती होत असून मोठया प्रमाणात डिझेल वाया जात असतांनाही याकडे संबंधित अधिका-याकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त डिझेल टाकी तात्काळ नविन बसविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०२-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

जाफराबाद आगार परिसरात दि. ०५.०८.२०१५ रोजी अतिवृष्टी झाल्यामुळे भूमीगत डिझेल टाकीजवळ मोठ्या प्रमाणात पाणी बराच काळ साचल्यामुळे डिझेल टाकीच्या झाकणातून पाणी डिझेल टाकीत गेले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाद्वारे दिनांक १९.१२.२०१५, दिनांक ०२.०१.२०१६ व दिनांक २४.०१.२०१६ च्या पत्रान्वये भुमिगत डिझेल टाकी बदलण्याबाबत मे.इंडियन ऑईल कंपनीस कळविण्यात आले असता, संबंधित तेल कंपनीकडून भूमिगत डिझेल टाकीची तपासणीअंती दुरुस्ती करण्यात येवून सदर टाकी बदलण्याची आवश्यकता नसल्याचे संबंधित कंपनीद्वारे कळविण्यात आल्याने सदरची टाकी बदलण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाळेच्या १०० मीटर पर्यंतच्या परिसरात दारु आणि सिगरेट विकणे यास बंदी असल्याबाबत

**(४२) ३७८५८ (१२-०१-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नियमानुसार शाळेच्या २०० मीटर पर्यंतच्या परिसरात दारु आणि सिगरेट विकणे यासं बंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शाळेच्या आवारात २०० मीटरच्या आत देशी दारुचा बार उघडपणे चालू आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन संबंधितावर काय कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०३-२०१६) :** (१) महाराष्ट्र देशी दारु नियमावली, १९७३ मधील नियम २५ ४ (बी) अन्वये शैक्षणिक संस्थेपासून देशी दारु किरकोळ विक्रीचे दुकान महानगरपालिका तसेच अ व ब वर्ग नगर परिषद क्षेत्रात ५० मीटर व इतर ठिकाणी १०० मीटर अंतराच्या आत नसावे, अशी तरतूद आहे. तसेच सिगारेट व अन्य तंबाखुजन्य कायदा, २००३ च्या कलम ६ (ब) अनुसार, शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास बंदी आहे.

(२) सदर सीएल-३ अनुज्ञप्तीचे ठिकाण व कल्याण- बदलापूर रोड, अंबरनाथ (प) येथील महात्मा गांधी महाविद्यालय यामध्ये संरक्षक भिंत असल्यामुळे महाविद्यालयाचे प्रवेशद्वार व अनुज्ञप्ती यामधील अंतर १३० मीटर एवढे होते. नियमानुसार सदर अनुज्ञप्तीची जागा अंतरनिर्बंधमुक्त होती. तथापि सद्यस्थितीत रस्ता रुंदीकरणामध्ये संरक्षक भिंत पूर्णपणे तोडण्यात आल्याने महाविद्यालयाचे प्रवेशद्वार व अनुज्ञप्तीचे ठिकाण यातील अंतर सरळ रस्त्याने ४५ मीटर एवढे झाले आहे.

सद्यस्थितीत अनुज्ञप्तीधारकांच्या मृत्यूनंतर वारसांतील वादामुळे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि. ७.१२.२०१५ च्या आदेशान्वये सदर अनुज्ञप्ती वारसांतील वाद मिटेपर्यंत निलंबित ठेवण्यात आली आहे.

(३) या प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर अनुज्ञप्ती वारसांतील वाद मिटेपर्यंत निलंबित ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरकवड्यातील चनाखा (जि.यवतमाळ) येथे कंपनीच्या निकृष्ट बियाणामुळे कपाशीची झाडे मर रोगाने पिपळी पडली असल्याबाबत

**(४३) ३७८७३ (१५-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवड्यातील चनाखा (जि.यवतमाळ) येथे पवन सिर्तावर याच्या २० एकर शेतात कपाशी व तुरीची लागवड करुन त्यामध्ये एका कंपनीच्या बियांणाची पाच एकरावर लागवड केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीच्या निकृष्ट बियाणामुळे कपाशीची झाडे मर रोगाने पिपळी पडली असल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बियांणामुळे सिर्तावर यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदरहू कंपीनीवर कारवाई करण्याबाबत तसेच सिर्तावर यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :** (१) होय.

(२) मोन्सॅटो होल्डींग प्रा.लि. मुंबई या सीड कंपनीच्या ब्रम्हा बीजी-२ (लॉट क्र. ००७९) या वाणाची बीटी कपाशीची झाडे ही कंपनीच्या बियाणामुळे पिवळी पडून वाळली नसून ती पावसातील खंड, जमिनीतील कमी ओलावा व वातावरणातील अधिक तापमान यामुळे पिकास अजैविक ताण (abiotic Stress) पडून कपाशीची झाडे पिवळी पडून वाळली.

(३) बियाणामुळे नुकसान झालेले नसून वातावरणातील बदलामुळे नुकसान झालेले आहे.

(४) व (५) श्री.सिर्तावर यांची तक्रार माहे ९/१५ मध्ये प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरीय समिती मार्फत बाधित क्षेत्राची पाहणी दिनांक ८/१०/२०१५ रोजी करण्यात येऊन वरीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. त्यामुळे कंपनीची चौकशी करण्याचा व कंपनीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच श्री.सिर्तावर यांना नुकसान भरपाई देण्याचा सुध्दा प्रश्न उद्भवत नाही.

(६) विलंब झालेला नाही.

---

## स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(४४) ३७९३८ (२०-०१-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याच्या हेतूने स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना दिनांक १८ नोव्हेंबर, २००४ रोजी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना करण्यासाठी ५ वेळा शिफारशी करून सुद्धा शासनाने शिफारशी स्वीकारल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१६) :** (१) हे खरे आहे. केंद्रीय कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १८ नोव्हेंबर, २००४ च्या शासन निर्णयान्वये डॉ.स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.
(२) राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना करण्यासाठी ५ वेळा शिफारस करण्यात आल्याची बाब केंद्रीय कृषि मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर आढळून येत नाही.
(३) डॉ. स्वामिनाथन आयोगाने ऑक्टोंबर, २००६ मध्ये त्यांचा अंतिम अहवाल केंद्र शासनास सादर केलेला होता. सदर अंतिम अहवालासोबत शेतकऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय धोरणाचा मसुदा सादर केला होता. सदर प्रारुप मुद्यांवर केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयीन विभाग व देशातील सर्व राज्य यांच्याशी चर्चा करुन केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषि धोरण २००७ प्रसिध्द केले होते. सदर धोरण अंमलात आणण्याचा अंतिम आराखडा केंद्र शासनाने ऑक्टोंबर, २००८ मध्ये तयार केला आहे. केंद्र शासनाने त्यांचे दि. १६ सप्टेंबर, २००९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सदर कृति आराखड्यातील ज्या मुद्यांवर राज्य शासनाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे ६६ मुद्दे कृषि विभागासह इतर विभागाशी संबंधित असल्याने संबंधित विभागास कळविण्यात आले आहे व त्यावर त्या त्या विभागांमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव ठाकूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील शेतकऱ्याला अपघात विमा लाभ देण्याबाबत**

**(४५) ३८१५१ (१६-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव ठाकूर (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील गोपाळराव गुलाबराव यांचे दि. १.६.२००० रोजी मौजे विचोरी ता.तिवसा येथील शेत सर्व्हे नं. ११९ मध्ये कांद्याच्या मचांगाखाली दबुन ते मरण पावले परंतू त्यांच्या कुटुंबियांना शेतकरी अपघात विमाचा लाभ मिळाला नसल्याने मा.लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, जि.अमरावती यांना श्री. सुरेश गोपाळराव निमावत यांना शेतकरी अपघात विमाचा लाभ देण्याबाबत दि.२३.२.२०१५ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार शेतकरी उपघात विमा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०२-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणाऱ्या अपघातात मृत्यू पावणाऱ्या अथवा अपंगत्व येणाऱ्या शेतकऱ्यांना विमा संरक्षण विमा संरक्षण देण्यासाठी शासनाने सन २००५-०६ पासून शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना सुरु केली आहे. सदरची योजना दि.10 जानेवारी, २००५ पासून सुरु झाली आहे. प्राप्त निवेदनातील शेतकरी गोपाळराव गुलाबराव निमावत यांचे दि. १/६/२००० रोजी अपघाती निधन झाले असल्याने त्यांना योजनेंअंतर्गत विमा लाभ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सुमारे २५ हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती घोषित केल्याबाबत

**(४६) ३८२५१ (१२-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत सुमारे २५ हजार रुपयांपर्यतची शिष्यवृत्ती माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना २५ हजार रुपयांपर्यतची शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०२-२०१६) :** (१) नाही.
अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी रु. २५,०००/- पर्यंतची शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे.
(२) आजतागायत एकूण १,७२,८७० अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानवत (जि.परभणी) तालुक्यातील कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी यांचेसह ११ जणांवर फसवणूकीचा गुन्हा दाखल केल्याबाबत

**(४७) ३८७०४ (१५-०१-२०१६). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) तालुक्यातील कृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी यांचेसह ११ जणांवर फसवणुकीचा गुन्हा माहे २०१५ मध्ये मा.न्यायालयाच्या आदेशाने दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील तालुक्यामधील कृषी अधिकारी गैरव्यवहारा प्रकरणी निलंबित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी जिल्हा कृषी अधिक्षक यांचेविरुध्द अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्ह्यातील कृषी विभागात मोठया प्रमाणावर होत असलेल्या गैरव्यवहारा प्रकरणी कृषी अधिक्षकांवर तातडीने कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०३-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) नाही. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामुहीक शेततळे प्रकरणी अनुदान प्राप्तीसाठी लाभार्थ्यांने नोटरी करारनाम्यावर खोटी स्वाक्षरी केल्याबाबत तक्रारदाराने ११ जणांविरुध्द मा.न्यायालयात खटला दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. याप्रकरणी कृषि विभागाच्या कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केला नसल्याने कारवाई करण्यात आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कृषि विमा योजना २०१४-१५ अंतर्गत मंजूर झालेल्या खरीप विमा रकमेबाबत

**(४८) ३८७८३ (२१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषि विमा योजना २०१४-१५ अंतर्गत खरीप विम्यापोटी सुमारे १६०० कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रकमेचे तातडीने वितरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत खरीप २०१४ मध्ये राज्यातील एकूण ४४.७९ लाख शेतकऱ्यांनी रु. १७६.२४ कोटी विमा हप्ता भरुन २८.०५ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षीत केलेले होते. त्यापैकी ३४.८७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले असून पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना रु. १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(२) भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत सदरची रक्कम सबंधित बँकाकडे वर्ग करण्यात आलेली असून संबंधित बँकामार्फत ती शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य उत्पादन शुल्क विभागात सुमारे २०० उपनिरिक्षक कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय कार्यरत असल्याबाबत**

**(४९) ३८८४१ (१२-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवैद्य दारुला प्रतिबंध करुन परवाना प्राप्त दारुची अधिकाधिक विक्री करुन घेण्याची जबाबदारी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागात सुमारे २०० उपनिरिक्षक कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय कार्यरत असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी या विभागाच्या उपनिरीक्षकांना योग्य प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१३-०३-२०१६) :** (१), (२), (३) व (४) संचालक, राष्ट्रीय सीमा शुल्क, उत्पादन शुल्क तथा नारकोटिक्स अकॅदमी, पश्चिम क्षेत्र, भांडूप, मुंबई यांच्यामार्फत राज्य उत्पादन शुल्क विभागातील ५० दुय्यम निरीक्षकांना नारकोटिक्स ड्रगचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच त्यांना १ महिना अधिकारी आसवनी प्रशिक्षण व ३ महिने पोलीस प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे. संचालक महाराष्ट्र पोलीस अकॅदमी, नाशिक किंवा तुरुंग अधिकारी, प्रशिक्षण शाळा, येरवडा पुणे यांच्यामार्फत निश्चित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार पोलीस प्रशिक्षण देण्यात येते. सध्या या दोन्ही प्रशिक्षण केंद्रावर या विभागातील दुय्यम निरीक्षक तसेच इतर अधिकारी यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था अद्याप होऊ शकलेली नाही. मात्र विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या स्तरावर आवश्यक बाबीचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले आहे. तसेच पोलीस प्रशिक्षणाकरीता पोलीस विभागाकडे पाठपुरवा करण्यात येत आहे.

---

**राज्यातील सर्व जिल्हयांत हवामानावर आधारित पीक विमा योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(५०) ३८८७७ (३१-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामानावर आधारित पीक विमा योजना सद्यस्थितीत राज्यातील केवळ १२ जिल्ह्यांतच कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना राज्यातील उर्वरित जिल्ह्यात तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२६-०२-२०१६)** : (१) हवामानावर आधारित पीक विमा योजना पथदर्शक स्वरुपात खरीप हंगाम २०१५ मध्ये राज्यातील १३ जिल्ह्यात राबविण्यात आलेली आहे.
(२) सध्या हवामानावर आधारित पीक विमा योजना राज्यात क्षेत्र घटक (Area Approach) धरुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार, पथदर्शक स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतील शेतकऱ्यांचा सहभाग, योजनेअंतर्गत निश्चित केलेली पिक निहाय हवामानाची प्रमाणके, शेतकऱ्यांना योजनेपासून मिळणारा फायदा/नुकसान भरपाई इ. बाबींच्या आधारे योजनेची उपयुक्तता तपासून आलेल्या निष्कर्षांच्या आधारे ती राज्यातील उर्वरित जिल्ह्यात राबविण्याबाबत विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.